# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**अकोला येथील अतिविशेषोपचार रुग्णालयासाठी आवश्यक असलेली पदे भरती करणेबाबत**

**(१) ९८५४ (२८-०५-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील अतिविशेषोपचार रुग्णालयासाठी शासनाने आवश्यक असलेली पदे मंजूर केलेली असताना फक्त पदभरती अभावी सदर रुग्णालय सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालय हे कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर रुग्णसेवासाठी सुरु करावे अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालय सुरु करण्यासाठी तेथे पदभरती करुन कोरोना बाधीत रुग्णांच्या उपचारासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२१-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

पंतप्रधान स्वास्थ सुरक्षा योजनेअंतर्गत अकोला येथे अतिविशेषोपचार रूग्णालयासाठी वर्ग-१ ते वर्ग-४ संवर्गात एकूण ४६५ पदे निर्माण करण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(२) होय.

(३) अतिविशेषोपचार रूग्णालयासाठी बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये कोविड रूग्णांकरीता ३०० खाटांची व्यवस्था करण्यात आली असून उपलब्ध मनुष्यबळाच्या माध्यमातून रूग्णांवर उपचार करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेंबळा प्रकल्पाच्या लाडकी (ता.राळेगाव जि.यवतमाळ) लघुकालव्याचे काम पूर्ण करणेबाबत**

**(२) ९९३७ (२८-०५-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करंजी (ता.राळेगाव जि.यवतमाळ) शिवारातील बेंबळा प्रकल्पाच्या लाडकी लघु कालव्याचे बांधकाम पुर्ण न झाल्याने शेतक-यांना शेती सिंचनाकरिता पाणी मिळत नसल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२)असल्यास,लाडकी लघु कालव्याच्या बांधकामास मंजुरी दिली असल्याने विभागाच्या अधिकाऱ्याकडून शिवारामध्ये सर्वे केला असताना सिंचनापासुन वंचित असलेल्या शेतक-यांनी लघुकालव्याचे काम तात्काळ करण्यात यावे अशी मागणी बेंबळा प्रकल्प अधिकारी यांना निवेदनाद्वारे केलेली असतानाही विभागाच्या अधिका-यांनी कालव्याचे बांधकाम पुर्ण करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार मंजूर लाडकी लघुकालव्याचे काम तात्काळ पुर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (११-०८-२०२०) :** (१) नाही. सदर लघुपाटाचे काम दि.१६/०६/२०१५ रोजी पूर्ण झाले आहे. सदर शेतक-याची मौजा करंजी येथील शेती बेंबळा प्रकल्पाचे लाभक्षेत्रातील गावांचे अधिसुचनेनुसार लाभक्षेत्रात समाविष्ट आहे. परंतु सदर शेती लघुपाटाच्या नंतर जवळपास २५० मी.अंतरापर्यंत उंच भागाच्या पलीकडे असल्यामुळे सिंचन होत नाही.

(२) नाही. सदर लघुपाटाचे काम पूर्ण झालेले आहे. परंतु शेतक-यांचे निवेदन प्राप्त झाल्यानंतर संबंधित अधिका-यांनी जून महिन्यात मोकास्थळी भेट दिली. त्यावेळी पाऊस असल्याने व नंतर उभी पिके असल्याने सविस्तर सर्वेक्षण करणे शक्य झाले नाही. उंच भागाच्या पुढे कालवा नेऊन सिंचन करता येणे शक्य आहे काय, याबाबत सविस्तर सर्वेक्षण करण्यात येईल.

(३) व (४) सदर लघुपाटाचे काम पूर्ण झाले असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंबाजोगाई (जि.बीड) येथे कोरोना' विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळा सुरू करणेबाबत**

**(३) १०३१८ (०३-०६-२०२०). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बीड जिल्ह्यातील आंबाजोगाईसह सहा शहरात कोविड-१९ (कोरोना) तपासणीसाठी विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेस मंजुरी दिली असताना महिना होऊन गेला तरी अंबाजोगाई येथील प्रयोगशाळा अद्याप सुरू झालेली नसल्याने बीड, लातूर आणि उस्मानाबाद या तीन जिल्ह्यातील कोरोना संशयितांचे स्वाब तपासणीसाठी लातूरला पाठवण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मंजूर करण्यात आलेली विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळा तातडीने सुरू करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार आंबाजोगाई येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळा तातडीने सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (३१-०८-२०२०) :** (१) होय, कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई येथील कोरोना संशयितांचे स्वॅब तपासणीकरीता लातूरला पाठविण्यात येते होते. तथापि, अंबाजोगाई येथे दिनांक ०८/०६/२०२० पासून कोविड-१९ निदान चाचण्या करण्याकरीता मान्यता प्राप्त झालेली असून सदर प्रयोगशाळेमार्फत कोविड-१९ च्या तपासण्या करण्यात येत आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) अंबाजोगाई येथे कोरोना विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळा दिनांक ०८/०६/२०२० पासून सुरु करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबरनाथ (जि.ठाणे) आनंदनगर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील रस्त्याच्या कामाच्या निधीचा अपव्यय झाल्याबाबत

**(४) १०९५८ (०७-०६-२०२०). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) आनंदनगर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उपविभागीय कार्यालय ते अग्निशमन केंद्रापर्यंत १३०० मीटर लांबीच्या चार पदरी डांबरी रस्त्याचे मजबुतीकरण व काँक्रीट रस्ता बांधणीचे काम सुरु असून सदर कामाची निविदा रक्कम रू.१२,९७,८८,९२०/- इतकी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त रस्त्यांचे आतापर्यंत करण्यात आलेले काम अत्यंत्य निकृष्ट दर्जाचे असून शासनाच्या निधीचा अपव्यय झाल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार संबधित औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रशासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त औद्योगिक वसाहतीचे काम पुर्ण करण्यासह संबंधित कंत्राटदार व कंपनीवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२६-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी अतिरिक्त अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रात सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाच्या प्रगतीबाबत महामंडळाच्या विभागीय व प्रादेशिक कार्यालयाकडे पत्राद्वारे विचारणा केली असून दि.१७.०१.२०२० रोजी प्रगतीपथावर असलेल्या कामास भेट देऊन सुरू असलेल्या कामाबाबत समाधान व्यक्त केले होते. तसेच निविदेतील निकषांनुसार कामे करण्याबाबत सुचना देखिल दिल्या होत्या.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आसरा (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्यांनी विकेलेल्या ऊसाची थकीत रक्कम मिळण्याबाबत**

**(५) ११०५७ (०७-०६-२०२०). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आसरा (ता.आर्णी, जि.यवतमाळ) गावासह परिसरातील हजारो ऊस उत्पादक शेतकरी यांनी दरवर्षी हजारो टन ऊस मंगळूर येथील डेक्कन शुगर कंपनीला विकला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी गळीत हंगाम सन २०१९-२०२० मध्ये शेतकऱ्यांनी विकलेल्या ऊसाची सुमारे १.९० कोटी इतकी रक्कम उक्त कंपनीने थकविल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्याच्या महामारीच्या परिस्थितीमुळे तसेच पीक व्यवस्थापन व खरीप हंगामाकरीता खर्च करण्याकरीता शेतकऱ्यांकडे पैसे नसल्याने शेतकऱ्यांवर बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांची थकीत रक्कम परत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०९-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

गळीत हंगाम २०१९-२० मध्ये आसरा (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील १०१ शेतकऱ्यांनी ९९३९.२३० मे. टन ऊस डेक्कन शुगर लि. मंगरुळ, जि. यवतमाळ या कारखान्यास गाळप करणेसाठी पुरवठा केलेला आहे.

(२) अशंत: खरे आहे.

गळीत हंगाम २०१९-२० मध्ये आसरा परिसरातील ऊस पुरवठादार शेतकऱ्यांनी डेक्कन कारखान्यास पुरविलेल्या ९९३९.२३० मे.टन ऊसाचे देय FRP प्रमाणे रु.१.१७ कोटी इतकी रक्कम आहे. यापैकी कारखान्याने दि.०५/०६/२०२० रोजी ऊस पुरवठादारांना रु.८६ लाख ऊसाचे पेमेंट केले असून कारखान्याकडे रु.३१ लाख १५ टक्के व्याजासह प्रलंबित आहे.

(३) होय, हे खरे आहे.

कोविड-१९ या महामारीमुळे देशात व आंतरराष्ट्रीय स्तरावर लॉकडाऊन जाहीर झाल्याने सर्व आर्थिक व्यवहार थंडावलेले आहेत. दळणवळण व्यवस्था पुर्णत: बंद करण्यात आलेली आहे. परिणामी शेतकऱ्यासह सर्वच घटकांवर बिकट आर्थिक परिस्थीती ओढावलेली आहे. कारखान्यांना साखरेची विक्री पुरेशा प्रमाणात करता आली नाही. त्यामुळे साखर कारखान्यांना निधी कमतरतेमुळे शेतकऱ्यांची ऊस देयके सत्वर अदा करता आलेली नाहीत.

(४) प्रादेशिक सह संचालक (साखर) अमरावती यांनी दि.०९/०६/२०२० चे पत्रान्वये डेक्कन शुगर्स या कारखान्याकडील थकीत FRP संदर्भात ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ चे कलम ३(८) च्या तरतुदीनुसार RRC प्रमाणे कारवाई करणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. याबाबत साखर आयुक्तालयाचे स्तरावरुन पुढील कार्यवाही करणेत येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) येथे पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीतील जागेवर रिसोर्ट, रेस्टॉरंट व मनोरंजन पार्क प्रकल्पाला अनधिकृतपणे मान्यता दिल्याबाबत

**(६) ११३१५ (१०-०७-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) येथे पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीतील २८ एकर जागेवर बांधा, वापरा, हस्तांतरीत करा (बी.ओ.टी.) तत्वावर रिसोर्ट, रेस्टॉरंट व मनोरंजन पार्क या बांधकामाला नियम डावलून मान्यता देण्यात आल्याचे माहे जून,२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बी.ओ.टी. (बांधा, वापरा, हस्तांतरीत करा) तत्वावरील रिसोर्ट, रेस्टॉरंट व मनोरंजन पार्क या नियोजित बांधकामाला मान्यता देतांना जलसंपदा विभागाने दिनांक १७ जून, २०१९ रोजीच्या शासन निर्णयाचा आधार घेतला असला तरी शासन निर्णय आणि कामाची निविदा प्रत यामध्ये विसंगती आढळून येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खडकवासला धरण व आजूबाजूचा परिसर हा 'रेड झोन' असतांना शेतकऱ्यांच्या जमिनी धरणासाठी अधिग्रहीत करताना त्या 'मनोरंजन पार्क' ला प्रकल्पाच्या नावाखाली नियमबाह्य पद्धतीने मान्यता देण्यात आली असल्याचे मा.जलसंपदा मंत्री यांना जा.क्र.१३१२ ने दिनांक २३ जून,२०२० रोजी तसेच कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग यांना जा.क्र.१३१३ ने दिनांक २३ जून,२०२० रोजी पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने अद्यापही कुठलीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (३१-०८-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

जलसंपदा विभाग, शासन निर्णय, दिनांक १७.०६.२०१९ मधील परिच्छेद २(ग), अ.क्र.२१ नुसार एक पथदर्शी प्रकल्प म्हणून जाहीर निविदेद्वारे सदर प्रकल्पाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) होय, मा.विधान सभा सदस्य यांचे पत्र प्राप्त असून क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) हे खरे नाही.

मा.विधान सभा सदस्य यांचे पत्राद्वारे उपस्थित मुद्यांच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) जलसंपदा विभाग, शासन निर्णय, दिनांक १७.०६.२०१९ मधील तरतुदीनुसार कार्यवाही प्रगतीत असल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड गाव (ता.हवेली, जि.पुणे) ग्रामपंचायत हद्दीतील पाटबंधारे विभागाच्या जमिनीवर अनधिकृत बांधकामे केल्याबाबत**

**(७) ११३३८ (१६-०७-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड गाव (ता.हवेली, जि.पुणे) ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नं.११/१६ पाटबंधारे विभागाच्या जमिनीवर अनधिकृत बांधकामे झाली असल्याबाबत माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाटबंधारे विभागाच्या जमिनीवर अधिकाऱ्यांच्या संगनमताने अनधिकृत बांधकामे झाली असून अदयापही अनधिकृत बांधकामे सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०३-०८-२०२०) :** (१) हे अंशतः खरे आहे.

हद्दीतील सर्व्हे नं. ११/१६ मध्ये कालव्यालगत खडकवासला नवीन मुठा उजवा कालवा लगतच्या नांदेड गाव (ता.हवेली,जि.पुणे) ग्रामपंचायत पत्राशेड,जनावरांचा गोठा अशा प्रकारची ४-५ कच्ची शेडची बांधकामे २००५ पासून टप्प्या टप्प्याने वाढल्याचे दिसून येत आहेत.

(२) हे खरे नाही.खडकवासला कालव्यावरील सदर अतिक्रमणे तसेच पुणे शहर हद्दीतील कालव्यावरील अतिक्रमणे काढणेबाबत क्षेत्रीय स्तरावरून नोटिसा देण्यात आल्या असून, कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग,पुणे कार्यालयाकडून याबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) कार्यवाही प्रगतीत असल्याने प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शेतमालाची खरेदी करण्याकरीता खरेदी केंद्र सुरु करणेबाबत**

**(८) ११३६० (१३-०७-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कापूस, तूर, चणा व अन्य शेतीमालाची खरेदी केंद्र सुरू करण्याची घोषणा करण्यात आली असली तरी प्रत्यक्षात ठराविक ठिकाणी खरेदी केंद्रे उघडण्यात आली असल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिखली (जि.बुलढाणा) येथील कापूस खरेदी केंद्र कमी असून जी केंद्रे सुरु केली होती ती बंद झालेली असून कापूस खरेदी केंद्रे सुरु करावी अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २९ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच लॉकडाऊनच्या काळात सुमारे दीड महिना कापसाची खरेदी बंद असल्यामुळे सुमारे सव्वादोन हजार कोटी रुपयांचा ५० लाख क्विंटलहून अधिक कापूस शेतकऱ्यांच्या घरातच पडून असल्याची बाब दिनांक १६ मे, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली असून, ३०६ बाजार समित्यांपैकी सुमारे २६० ते २७० बाजार समित्यांमध्ये शेतमालाचे व्यवहार अत्यंत संथ गतीने सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच बिलोली ता. देगलूर (जि.नांदेड) येथे खरीप हंगामात सन २०१९-२०२० मध्ये सुरु केलेले खरेदी केंद्र विविध कारणामुळे अनेक वेळा बंद पडल्याने व पावसाळ्यात कापूस खरेदी होणार नसल्याने शासनाने शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल २००० रुपये मदत देण्याची मागणी शेतकरी वर्गातून केली जात असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात खरीप हंगाम सुरु होणार असल्याने तत्पुर्वी बी-बियाणे, खते यासाठी शेतकऱ्यांकडे पैसा असणे आवश्यक असल्याने शेतमालाची तात्काळ खरेदी होण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात शेतमाल खरेदी केंद्रे सुरू करण्याबाबत विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक २० एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांना पत्राद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शेतमाल खरेदी केंद्र सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०७-०८-२०२०) :** (१) नाही, हे खरे नाही.

हंगाम २०१९-२० मध्ये कापसाला केंद्र शासनाद्वारे जाहीर केल्या जाणाऱ्या किमान हमी दराने राज्यामध्ये केंद्र शासनाच्या मुख्य अभिकर्ता भारतीय कपास निगम लिमिटेड (सीसीआय) यांच्याद्वारे एकूण ९० कापूस खरेदी केंद्रावर २३७ जिनिंग फॅक्टरी मध्ये तसेच त्यांचे उप अभीकर्ता म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ द्वारे सद्यस्थितीत ८९ खरेदी केंद्रावर १७६ जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीमध्ये कापसाची खरेदी करण्यात येत आहे. दिनांक २२ जुलै २०२० अखेरपर्यंत सीसीआय द्वारे ५,३०,४३८ शेतकऱ्यांकडून १२७.६८ लाख क्विंटल तर कापूस पणन महासंघाद्वारे ३,३३,६३४ शेतकऱ्यांकडून एकूण ९१.१३ लाख क्विंटल अशा प्रकारे एकूण २१८.८१ लाख क्विंटल कापसाची खरेदी झालेली आहे. तथापि, covid-१९ आजाराच्या संक्रमणामुळे राज्यात दिनांक २४ मार्च २०२० रोजी केलेल्या टाळेबंदी मुळे किमान हमी दराने सुरु असलेली कापूस खरेदी केंद्र पूर्णतः बंद ठेवावी लागल्याने शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करता आला नाही. परंतु, केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने लॉकडाऊनच्या कालावधीत शेतमालाची हमी भावाने खरदी करण्यास परवानगी दिल्यानंतर कापसाची पुन्हा खरेदी सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

सीसीआय द्वारे बुलढाणा जिल्ह्यात चिखली, खामगाव, मलकापूर, नांदुरा अशा चार ठिकाणी कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात आलेली असून, दिनांक २१ जुलै २०२० अखेर एकूण १२.०८ लाख क्विंटल कापसाची खरेदी झालेली आहे.

(३) काही अंशी खरे आहे.

सीसीआय द्वारे एकूण ९० कापूस उत्पादक तालुक्यात २३१ जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीमध्ये तर कापूस पणन महासंघ द्वारे एकूण ८९ कापूस उत्पादक तालुक्यात १७६ जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीमध्ये किमान आधारभूत दराने कापूस खरेदी प्रक्रिया चालू आहे अशा एकूण १७९ कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये (कापूस उत्पादक क्षेत्र जास्त असलेल्या तालुक्यामध्ये) ४०७ जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी अध्याय कापूस खरेदी प्रक्रिया चालू आहे.

(४) अंशत: खरं आहे.

बिलोली, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड येथे सीसीआय मार्फत सुरू करण्यात आलेले कापूस खरेदी केंद्र जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आलेल्या निसर्ग चक्रीवादळाच्या प्रभावामुळे वादळ पाऊस व टाळे बंदीमुळे मजूरवर्ग परराज्यात गेल्यामुळे सदर केंद्रावरील जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी मालकाने फॅक्टरी बंद ठेवल्यामुळे सी सी आय चे कर्मचारी तसेच अधिकारी त्या ठिकाणी हजर असताना देखील सदर केंद्र नंतर सुरू करण्यात आलेले नाही. बिलोली या खरेदी केंद्रावर २९ हजार ३४० क्विंटल कापसाची खरेदी करण्यात आलेली आहे. तसेच सीसीआय द्वारे नांदेड जिल्ह्यात नायगाव, धर्माबाद, नांदेड, किनवट, बिलोली, कुंटूर या सहा कापूस खरेदी केंद्रावर दिनांक २१ जुलै २०२० अखेर एकूण २२३३२ शेतकऱ्यांकडून ५.१४ लक्ष क्विंटल कापसाची खरेदी करण्यात आलेली आहे

तसेच कापूस पणन महासंघ द्वारे नांदेड जिल्ह्यात तामसा आणि भोकर अशा दोन खरेदी केंद्र वर तीन जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीमध्ये ११२७६ शेतकऱ्यांकडून २.४० लाख क्विंटल कापसाची खरेदी झालेली आहे.

(५) होय.

(६) कापूस पणन महासंघाकडे उपलब्ध असलेल्या सेवक वर्ग व ग्रेडर्स यांची संख्या विचारात घेता, कापूस पणन महासंघाने हंगाम २०१९-२० मध्ये एकूण ४० कापूस खरेदी केंद्र सुरू करण्याचे नियोजित केले होते. तथापि, किमान आधारभूत दराने मोठ्या प्रमाणात कापूस खरेदी करणे आवश्यक असल्याने कापूस पणन महासंघाने १२७ कापूस खरेदी केंद्रांमध्ये १७६ जिनिंग-प्रेसिंग फॅक्टरी द्वारे कापूस खरेदी प्रक्रिया सुरू केली होती. तथापि, मध्यंतरी कोविड-१९ या आजाराच्या संक्रमणामुळे उद्भवलेल्या अभूतपूर्व परिस्थितीमुळे शेतकऱ्यांकडे शिल्लक असलेला कापूस व त्यांची प्रतीक्षा यादी विचारात घेता आपात्कालीन योजनेअंतर्गत जिल्हाधिकारी स्तरावर अधिक केंद्र सुरु करणे करीता कृषी विभागातील कृषी पदवीधर सेवकांना केंद्र शासनाच्या सिरकोट या प्रशिक्षण केंद्रावर प्रशिक्षित करून ग्रेडींग च्या कामाकरिता त्यांना नियुक्ती देण्यात आली. एकूण ९२ कृषी पदवीधर सेवकांना नवीन कापूस खरेदी केंद्रावर ग्रेडींग च्या कामाकरिता नियुक्ती देण्यात आली. यामुळे कापूस पणन महासंघाला एकूण १२७ जिनिंग-प्रेसिंग फॅक्टरीच्या संकेत १७६ जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी पर्यंत वाढ करता आली. परिणामी, दैनंदिन कामकाज कापसाच्या खरेदीमध्ये वाढ होऊन सर्व जिल्हयातील शेतकऱ्यांची प्रतीक्षा यादी कमी होत आहे.

तसेच सीसीआय द्वारे एकूण ८२ कापूस खरेदी केंद्रावरून ९० कापूस खरेदी केंद्र अशी वाढ करून २३७ जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीमध्ये किमान हमी दराने कापूस खरेदी प्रक्रिया चालू आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोव्हिड-१९ या आजाराच्या उपचारासाठी लागणा-या टॉसिलिझमैब इंजेक्शनचा पुरवठा करणेबाबत**

**(९) ११४५० (१०-०७-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोव्हिड-१९ या आजाराच्या उपचारासाठी लागणा-या टॉसिलिझमैब इंजेक्शनचा राज्यात मोठ्या प्रमाणात तुटवडा असल्याचे दिनांक २२ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टॉसिलिझममैब या इंजेक्शनची वास्तविक किंमत ४५ हजार रुपये असतांना तुटवड्यामुळे या इंजेक्शनची विक्री ७० ते ८० हजार रुपयांना होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इंजेक्शनचा पुरेसा पुरवठा करण्यासह त्याचे दर कमी करुन गरजू रुग्णांना उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२४-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) वैद्यकिय शिक्षण व संशोधन विभागाने या औषधांच्या उत्पादक पुरवठादारांशी दराबाबत वाटाघाटी करुन टॉसिलिझमॅब इंजेक्शनचे दर कमी केले असून किंमत रुपये ३०,८७०/-इतकी असून त्यानुसार शासकीय रुग्णालयांना टॉसिलिझमॅब इंजक्शन उपलबध करुन देण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिल्लक साखर निर्यात करण्यासह थकीत अनुदानाची रक्कम मिळण्याबाबत**

**(१०) ११४६९ (१३-०७-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.मानसिंग नाईक (शिराळा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील सुमारे १८ लाख टन साखरेच्या निर्यातीसाठी परवानगी मिळाली आहे, परंतु त्यापैकी १० लाख टन साखरेचा करार करण्यात आला असून ८ लाख टन साखरेच्या निर्यातीचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे राज्यातील साखर उद्योग आर्थिक अडचणीत सापडला असल्याचे राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक श्री.प्रकाश नाईकनवरे यांनी दिनांक २३ एप्रिल, २०२० रोजी स्पष्ट केले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच केंद्र शासनाकडे राज्यातील साखर कारखान्यांचे साखर निर्यात प्रोत्साहन, राखीव साठा व सॉफ्ट लोन व्याज मिळून जवळपास ३००० कोटी अनुदानाची रक्कम थकीत असल्याची बाब माहे मे २०२० मध्ये निदर्शनास आली असून, सदर अनुदानाची रक्कम प्राप्त न झाल्याने राज्यांतील कारखाने, सभासद व शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शिल्लक साखर निर्यात होण्याबाबत तसेच थकीत अनुदानाची रक्कम मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०७-०८-२०२०) :** (१) नाही. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना हंगाम २०१९-२० साठी १७.७२ लाख मे.टन साखर निर्यातीचा कोटा मिळालेला आहे. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी दि.३०/०४/२०२० अखेर १४.३३ लाख मे.टन साखर निर्यातीसाठी करार केले असून त्यापैकी १२.६६ लाख मे.टन साखर निर्यात केलेली आहे. ५.०६ लाख मे.टन साखर निर्यात करणे शिल्लक आहे. तथापि, मार्च २०२० पासून कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी लॉकडाऊन जाहीर केला असल्याने अपेक्षित प्रमाणात साखर निर्यात होऊ शकली नाही.
(२) केंद्र शासनाकडून राज्यातील साखर कारखान्यांचे सन २०१८-१९ मधील रु.१९२/- कोटी इतके साखर निर्यात अनुदान प्रलंबित आहे. याशिवाय सन २०१९-२० या कालावधीची साखर

निर्यातीपोटी मिळणारी अनुदानाची रक्कम प्रलंबित आहे. कारण साखर कारखान्यांकडून साखर निर्यात अनुदानाचे सर्व प्रस्ताव केंद्र शासनाच्या स्तरावर सादर झालेले नाहीत. परंतु जुलै, २०२० मध्ये दोन साखर कारखान्यांना साखर निर्यात अनुदान मिळाल्याबाबत आणि त्या साखर कारखान्यांनी साखर निर्यात अनुदानाचा विनियोग FRP देणेसाठी केलेला असल्याने विनियोग दाखल्याचे प्रस्ताव साखर आयुक्तालयात दाखल केलेले आहेत.

राखीव साखर साठा (Buffer Stock) हंगाम २०१९-२० अनुदानाची रक्कम रु. २४० कोटी (दुसऱ्या तिमाहीपर्यंत) केंद्र शासनाकडून येणे प्रलंबित आहे.

केंद्र शासनाकडून राज्यातील ११३ साखर कारखान्यांना सॉफ्टलोन अनुदानापोटी रु.१४१.९६ कोटी रक्कम प्राप्त असून ५ कारखान्यांची रक्कम रु.३.४७ कोटी येणे प्रलंबित आहे. साखर निर्यात प्रोत्साहन अनुदान, बफर स्टॉक व सॉफ्ट लोन यावरील व्याज अनुदान प्रलंबित असले तरी दि.१५/०७/२०२० अखेर राज्यातील साखर कारखान्यांनी रु.१३७९०.२५ कोटींपैकी रु.१३५९३.७३ कोटी FRP पोटी रक्कम शेतकऱ्यांना अदा केलेली आहे.

(३) केंद्र शासनाने गळीत हंगाम २०१८-१९ मधील साखर निर्यातीस दि.१४/०३/२०२० पर्यंत मुदतवाढ दिलेली होती. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे दि.०९/०३/२०२० चे पत्रान्वये साखर हंगाम २०१८-१९ मधील साखर निर्यातीस दि. ३०/०४/२०२० पर्यंत मुदतवाढ मिळणेबाबत केंद्र शासनाकडे मागणी केलेली आहे. सन २०१९-२० हंगामातील साखर निर्यातीसाठी १ ऑक्टोबर, २०१९ पासून ३० सप्टेंबर, २०२० पर्यंत मुदत आहे. त्यामुळे ५.०६ लाख मे. टन शिल्लक साखर निर्यात होऊ शकेल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात पदोन्नतीच्या प्रक्रियेस दिलेली स्थगिती**

**(११) ११५१३ (१८-०८-२०२०). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकिय सेवेतील बढत्यांमधील आरक्षणाच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या निकालात राज्यसरकारला बढत्यांमध्ये आरक्षण देण्याची तरतूद केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार मागासलेपणा आणि योग्य प्रतिनिधित्व नसेल तर आरक्षण देता येईल असेही निकालात नमूद करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पदोन्नतीच्या प्रक्रियेस दिलेली स्थगिती उठविल्याबाबतचे आदेश निर्गमित करूनही शासन सदरील बढत्यांमधील आरक्षण देण्यास विलंब करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी उक्त प्रकरणाची चौकशी करून सदर प्रश्न सोडविण्यात येईल असे आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत प्रशासकीय स्तरावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नसल्याने बढत्यांमधील आरक्षणाबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या
निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (०३-०९-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.
मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२६.९.२०१८ रोजी, एम.नागराज प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१९.१०.२००६ रोजी दिलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्याची आवश्यकता नाही. तसेच पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या मागासलेपणाची माहिती संकलित करण्याची आवश्यकता नाही. मात्र अपुरे प्रतिनिधित्व आणि प्रशासकीय कार्यक्षमता या दोन अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे, असा निर्णय दिलेला आहे.
(३) नाही, मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.४.८.२०१७ च्या निर्णयास स्थगिती दिलेली नाही.
(४) हे, खरे आहे.
(५) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.२६.९.२०१९ च्या निर्णयास अनुसरुन राज्यात पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याची कार्यवाही करता येईल किंवा कसे याबाबत महाधिवक्ता यांचे कायदेशीर अभिप्राय घेण्यात आले असता, मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.४.८.२०२० च्या निर्णयास स्थगिती दिलेली नसल्यामुळे राज्यात पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याची कार्यवाही करता येणार नाही, असे अभिप्राय दिले आहेत.राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६ वरील अंतिम निर्णयानंतरच याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ आणि खाद्य निगम ब्रम्हपूरी व वडसा वखार केंद्रात वाहतूक व हाताळणीच्या लिलावात झालेला गैरव्यवहार

**(१२) ११५९९ (११-०७-२०२०). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ आणि खाद्य निगम ब्रम्हपुरी व वडसा वखार केंद्रात वाहतूक व हाताळणीच्या लिलावात १३ कोटी रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गैरव्यवहार चौकशी करून दोषी असलेल्या अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कारवाई करण्याची मागणी चंद्रपुर शहरातील लोकप्रतिनिधींनी मा अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने संबंधितांची चौकशी करुन शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१३-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) मा.मंत्री (अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) व अन्न नागरी पुरवठा विभागात चौकशी केली असता निवेदन प्राप्त झालेले नाही, असे त्यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अर्जुनी-मोरगांव (जि.गोंदिया) तालुक्यातील ईटीयाडोह धरणाच्या कालव्याची दुरुस्ती करणेबाबत**

**(१३) ११६२३ (१०-०७-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुनी-मोरगांव (जि.गोंदिया) तालुक्यातील ईटीयाडोह धरणाचा कालवा फुटल्याची बाब माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ईटीयाडोह धरणाचे अंतर सुमारे ८ किलोमिटर असून संचारबंदी असल्याने सदर बाब एक दिवसा नंतर गोठणगांव शाखा कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आल्याने लाखो लिटर पाणी वाया गेले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर धरणाच्या कालव्याची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२८-०८-२०२०) :** (१) होय.

(२) नाही.

सदर बाब त्याच दिवशी दिनांक २२ मार्च २०२० रोजी निदर्शनास आली व त्वरेने विसर्ग बंद करण्यात आला. सदर कामाचे स्वरुप पाहता उन्हाळी हंगामाच्या पाणी वाटपाकरीता लावण्यात आलेल्या मजुरां कडुनच सदर दुरुस्तीकाम दिनांक २२ मार्च २०२० रोजीच त्वरित चालू करण्यात आले. दिनांक २५ मार्च २०२० रोजी काम पूर्ण करून विसर्ग सुरळीत चालू करण्यात आला .

(३) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही,

सद्यस्थितीत इटियाडोह प्रकल्पाचे विशेषदुरुस्ती कामाचा प्रस्ताव क्षेत्रिय स्तरावर तयार करणे प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरुड नृसिंह (ता.जिंतूर, जि.परभणी) ग्रामपंचायत येथील ग्रामसेवक व सरपंच यांनी केलेला गैरव्यवहार**

**(१४) ११६४६ (०९-०७-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुड नृसिंह (ता.जिंतूर, जि.परभणी) ग्रामपंचायत येथील दिनांक १ एप्रिल, २०१८ ते ३१ मार्च,२०१९ मध्ये वा त्यादरम्यान तत्कालीन ग्रामसेवक व सरपंच यांनी संगनमताने लाखो रुपयांचा अपहार केला असल्याचे सिद्ध झाल्याने मुख्याधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी संबंधितांकडून १लाख ४५ हजार ८३४ रुपये वसूल करण्याचे आदेश दिले असल्याचे माहे जुन, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करताना संबंधित अधिकारी यांनी गैरव्यवहाराची खरी आकडेवारी लपून कागदोपत्री कमी आकडेवारी दाखवली तसेच ज्या कामासाठी निधी आला होता ते काम सोडून अन्य काम दाखविले असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश मुख्याधिकारी जिल्हा परिषद परभणी यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती जिंतूर यांना देऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नाही,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२८-०७-२०२०) :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

(४) होय, संबंधित दोषी अधिकारी यांच्याकडून अपहारीत रकमेची वसूली करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे (जि.धुळ) तालुक्यातील नेर ग्रामपंचायतीमध्ये १४ व्या वित्त आयोगाच्या निधीत झालेला गैरव्यवहार**

**(१५) ११६७३ (०९-०७-२०२०). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे (जि.धुळ) तालुक्यातील नेर ग्रामपंचायतीमध्ये १४ व्या वित्त आयोगाच्या निधीत गैरव्यवहार झाला असल्याचे माहे मार्च ,२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धुळे यांनी केलेल्या चौकशी अहवालावरून १४ व्या वित्त आयोगाच्या निधीत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला आढळून आला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुळा धरणातून करण्यात येणाऱ्या सिंचन व पाणी पुरवठयाची थकबाकी वसूल करणेबाबत**

**(१६) ११७५६ (१०-०७-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगर दक्षिण जिल्हयातील, नगर शहरासह पाच तालुक्यासाठी मुळा धरणातून पाणी पुरवठा करण्यात येत असून शेतकरी, स्थानिक स्वराज्य संस्थासह साखर कारखाने व पाणी पुरवठा योजनांच्या पाणी पट्टीची १८ कोटी ५५ लाख ८७ हजार रुपयांची थकबाकी एकटया मुळा पाठबंधारे विभागाची असल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंचन व्यवस्थापन कायदा झाल्यामुळे पाणी संस्थाच्या मार्फतच शेतकऱ्यांना पाणी देण्यात येते, तथापि या संस्था शेतकऱ्यांकडून पाणी पट्टी वसुल करतात पण सदरची रक्कम पाटबंधारे विभागाला न देता स्वत:कडे ठेवत असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिंचन व्यवस्थेच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी पाणी पुरवठा संस्थेची असताना, पाणी पुरवठा संस्था दुरुस्ती देखभालीची कामे करत नसल्याने जलसंपदा विभागाला सदरची कामे करावी लागतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर थकबाकी वसूल करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (१८-०८-२०२०) :** (१) मुळा पाटबंधारे विभागाची माहे मार्च २०२० अखेर सिंचनाची व बिगर सिंचनाची एकूण १६.८७ कोटी इतकी पाणीपट्टी थकबाकी आहे.
(२) महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन कायदा,२००५ या कायद्यानुसार हस्तांतरीत झालेल्या लाभक्षेत्रात पाणी वापर संस्थां मार्फतच शेतकऱ्यांना पाणी देण्यांत येते. उर्वरित क्षेत्रात शासनाच्या प्रचलित दराने पाणीपट्टी वसूल करण्यात येते. सदरच्या पाणी वापर संस्था शेतकऱ्यांकडून पाणीपट्टी वसूल करुन पाणीपट्टीची रक्कम पाटबंधारे विभागाला न देता स्वत:कडेच ठेवतात, त्याबाबत कुठलीही तक्रार क्षेत्रीय कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(३) हे खरे नाही.

लघु वितरिका व त्या खालील क्षेत्र पाणी वापर संस्थांना देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरित करण्यांत आलेले आहे. हस्तांतरित क्षेत्रावरील लघु वितरिका व शेतचाऱ्यांची दुरुस्तीची कामे पाणी वापर संस्थांमार्फत करण्यांत येतात. सद्यःस्थितीत मुख्य कालवे, शाखा कालवे व वितरिका इत्यादि पाणी वापर संस्थांना हस्तांतरित न केलेल्या कालव्यांची दुरुस्तीची कामे जलसंपदा विभागामार्फत करण्यांत येतात.

(४) सद्यःस्थितीत शासनाच्या प्रचलित कार्यपद्धतीनुसार वैयक्तिक थकबाकीदार शेतकरी, पाणीवापर संस्था व बिगर सिंचन पाणी वापरकर्त्यांना वसुलीबाबत नोटिसा बजावण्यात आलेल्या आहेत व त्यानुसार थकबाकीबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात माता-अर्भकांच्य मृत्यूच्या प्रमाणात वाढ होत असल्याबाबत

**(१७) ११७५७ (१०-०७-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मार्च-एप्रिल, २०२० या दोन महिन्यात कोरोनामुळे मृत्यू पावलेल्यांची संख्या ५४८ एवढी असून याच काळात मातांच्या व अर्भकांच्या मृत्यूंची संख्या ११०५ असल्याची बाब माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माता व अर्भकांच्या आरोग्याची काळजी घेतली नाही तर आगामी काळात माता व अर्भकांच्या मृत्यूंच्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आरोग्य विभागातील वरिष्ठ डॉक्टरांनी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य विभागात तब्बल १७ हजार रिक्त पदे असून, अर्थसंकल्पाच्या केवळ १ टक्का रक्कम खर्च होत असल्याचे देखिल निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार माता व अर्भकांच्या मृत्यूचे प्रमाण रोखण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (१७-०८-२०२०) :** (१) हे अंशतः खरे आहे.

एसआरएस बुलेटीन आणि एम.एम.आर. बुलेटीन २०१५-१७ नुसार देशाचा माता मृत्यू व अर्भक मृत्यू दर अनुक्रमे १२२ व ३३ असून राज्याचा अनुक्रमे ५५ व १९ आहे. तसेच मार्च व एप्रिल, २०२० मध्ये माता मृत्यू, अर्भक मृत्यू व कोरोना मृत्यू यांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.:-

| **महिना** | **मातामृत्यू** | **अर्भक मृत्यू** | **कोरोना मृत्यू** |
|---|---|---|---|
| मार्च | ७४ | ८६३ | १० |
| एप्रिल | ११२ | ८६५ | ४४९ |
| एकूण | १८६ | १७२८ | ४५९ |

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागात एकूण १७२९८ पदे रिक्त आहेत.

सन २०१९-२० मध्ये विभागास प्राप्त झालेल्या अर्थसंकल्पिय रकमेपैंकी ७९.७९० टक्के व प्रत्यक्ष वितरीत रकमेपैंकी ९०.१३७ टक्के रक्कम खर्च झाली आहे.

(४) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत बालमृत्यू व मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी पुढील उपाय योजना राबिविण्यात येतात.:-

**बाल आरोग्या संबंधी योजना :-** घरच्या घरी नवजात बालकांची काळजी (Home Based New Born Care), इन्टेसिफाईड एचबीएनसी, होम बेस्ड केअर फ्राम यंग चाईल्ड, नियमित लसीकरण, Mother Absolute Affection (MAA), अतिसार नियंत्रण पंधरवडा (IDCF), जंतनाशक मोहिम (De-worming Drive), ॲनिमिया मुक्त भारत, नवजात शिशु कोपरा (NBCC), बाल उपचार केंद्र (CTC), पोषण पुनर्वसन केंद्र (NRC), नवसंजीवनी योजना, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, बालमृत्यू अन्वेषण.

कोविड काळात व त्यानंतर माता बाल संगोपन सेवा सुरु ठेवणेकरीता उपाय योजना सुचविणे करीता शासनाने संचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली नवजात बालरोग तज्ञ व स्त्रीरोग तज्ञांची समिती स्थापन केली असून या समितीच्या शिफारशीनुसार अतिरिक्त उपाययोजना राबविण्यात येतील. दरम्यान संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांनी कोविड-१९ च्या आपात्कालीन परिस्थितीत नवजात बालकांचे व्यवस्थापन, अतिसार प्रतिबंध व पोषण पुनर्वसन केंद्र / बाल उपचार केंद्रात दाखल झालेल्या कुपोषित बालकांची काळजी घेण्याबाबत तसेच प्रजननक्षम स्त्रिया, गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना पुरक लोहयुक्त औषधे देण्याबाबत वेळोवेळी सूचना निर्गमित केल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कोरोना आजाराचा संसर्ग रोखण्यासाठी काम करणाऱ्या आयुर्वेदिक डॉक्टरांच्या मानधनाबाबत

**(१८) ११८०८ (१०-०७-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना आजाराचा संसर्ग रोखण्यासाठी काम करणाऱ्या ॲलोपथी व आयुर्वेदिक डॉक्टरांच्या कामात कोणताही फरक नसताना ॲलोपथी डॉक्टरांना दरमहा रु.८०,०००/- तर आयुर्वेदिक डॉक्टरांना रु.२४,०००/- इतके मानधन असा फरक करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे १२ वर्षाहुन अधिक काळापासून आदिवासी, नक्षली तसेच दुर्गम भागात काम करणारे सदरहू भरारी पथकातील आयुर्वेदिक डॉक्टरही मागील तीन महिन्यांपासून कोरोना आजाराचा संसर्ग रोखण्यासाठी काम करीत असून त्यांच्या मानधनाच्या बाबत होत असलेला अन्याय त्वरित दूर करण्याच्या मागणीचे निवेदन मा.मुख्यमंत्री, यांना सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२८-०७-२०२०) :** (१) ॲलोपॅथी डॉक्टरांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या आयुर्वेदिक डॉक्टरांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या भिन्न असल्याने वेतनातील तफावत दिसून येते. शासन निर्णय दिनांक ४ जुलै, २०१९ अन्वये कंत्राटी बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मानधनात रुपये ४०,०००/- पर्यंत वाढ केली आहे.

(२) मानधन वाढीबाबत निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) व (४) भरारी पथकाची स्थापना व कर्तव्य वर्षातील ठराविक कालावधीसाठीच्या मर्यादेत आहे. सदर पथकातील वैद्यकीय अधिकारी मानसेवी असून त्यांच्या मानधन वाढीबाबत गाभा समितीच्या निर्णयानुसार मानधन वाढीचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

---

**टाकीपठार-खराडे (जि.ठाणे) परिसरातील गावपाडयांना खराडे लघुपाटबंधारे प्रकल्पातून नवीन जलवितरिका मंजूर करणेबाबत**

**(१९) ११८९१ (१०-०७-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकीपठार-खराडे (जि.ठाणे) परिसरातील गावपाडयांना खराडे लघुपाटबंधारे प्रकल्पातून नवी जलवितरिका मंजूर करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांना माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान तसेच यापूर्वीही अनेक वेळा निवेदन दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खराडे लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या डाव्या वितरिकेजवळ नवी वितरिका काढल्यास सुमारे १० गावपाडयांना पाणीपुरवठा होवू शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार टाकीपठार-खराडे परिसरातील गावपाडयांना खराडे लघुपाटबंधारे प्रकल्पातून नवीन जलवितरिका मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२७-०७-२०२०) :** (१) होय.

(२) खराडे प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचे नियोजन पूर्ण झाले असल्याने अतिरिक्त पाणी शिल्लक नाही. त्यामुळे प्रस्तावित गावांना सिंचनासाठी तसेच पिण्यासाठी पाणी देता येणे शक्य नाही.

(३) मागणी नुसार कार्यक्षेत्राची पाहणी केली असून सदर गावे ही लाभक्षेत्राबाहेर व उंचावर असल्याने प्रवाही पद्धतीने पाणी देता येणे शक्य नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किन्हवली (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील अदिवली लघु बंधारा कालवा दुरुस्तीसाठी कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाचे पाईप वापरल्याबाबत**

**(२०) ११८९७ (१६-०७-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री**

पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किन्हवली (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील मुरबाड उपविभागांतर्गत असलेल्या सिंचन शाखा, शहापूर कार्यालय क्षेत्रातील अदिवली लघु पाटबंधारे धरणाच्या डाव्या कालव्याच्या २ कि.मी. लांब पाईपच्या दुरुस्तीच्या कामाकरीता कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाच्या पाईपचा वापर केल्याची बाब दिनांक ३ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तब्बल २४ वर्षानंतर सदरहू कालव्याच्या दुरुस्तीकरीता जवळपास ९९ लाख रूपयांचा निधी मंजूर होऊनही कंत्राटदाराने जुनेच फुटलेले पाईप जोडल्याचे निदर्शनास येताच ग्रामस्थांनी सदरहू दुरूस्तीचे काम बंद पाडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी कंत्राटदाराकडून करण्यात येत असलेली फसवणूक ही संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने होत असल्याने या प्रकरणाशी संबंधित पाटबंधारे विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांच्यासह या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास,त्यानुसार दोषी अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांच्यावर कारवाई करण्यासह कालव्याच्या दुरूस्तीच्या कामाकरिता नविन कंत्राटदाराची नियुक्ती करुन कालव्याच्या दुरूस्तीचे काम तात्काळ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०३-०८-२०२०) :** (१) नाही, हे खरे नाही.

आदिवली लघू पाटबधारे योजना, ता.शहापूर, जि.ठाणे धरणाच्या डाव्या कालवा दुरुस्तीचे काम सुरु नाही. तर उजवा कालवा १.८७ किमी मधील भू अंतर्गत वितरीका दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आलेले आहे. सदर काम करताना दोन पाईप जोडल्यानंतर सांध्याच्या (joint) ठिकाणी संधानक (concrete) करण्याकरिता तयार केलेल्या साच्याची (shuttering) चाचणी करण्याकरीता जुने पाईप वापरण्यात आले होते.

(२) अंशत: खरे आहे.

ठेकेदाराने जुन्या पाईपांचा वापर चाचणी कामाकरीता केलेला होता. सदरहू तांत्रिक बाब ग्रामस्थांना माहिती नसल्याने ग्रामस्थांनी काम बंद पाडले. तथापि या कामाचे ठेकेदारास कोणतेही देयक अदा करण्यात आले नाही व कामावर कसलाही खर्च झालेला नाही. तसेच कामामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी आढळून आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सदर जोडणी काम हे संधानक गळती व Shuttering चाचणी करिता करण्यात आले होते. याबाबत कंत्राटदाराकडून कोणतीही फसवणूक करण्यात आलेली नाही. सर्व तांत्रिक तपशीलांसह ठेकेदाराकडून काम पूर्ण करण्यात येत आहे. याबाबत चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुलवाडे जामफळ उपसा (ता.शिंदखेडा, जि.धुळे) योजनेच्या कामासाठी जमिन संपादीत करणेबाबत

**(२१) ११९८६ (१०-०७-२०२०). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुलवाडे जामफळ कनोली उपसा जलसिंचन योजना (ता.शिंदखेडा, जि.धुळे) या योजनेसाठी मागील काळात केंद्र सरकारच्या माध्यमातून २४०७ कोटींचा निधी मंजूर झाला असून त्याचे काम देखील सुरू झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेसाठी काही वन विभागाची तर काही खाजगी शेतक-यांची जमिन संपादीत करण्याची आवश्यकता असून जमिन संपादीत करण्याची प्रकिया सुरू करण्यास विलंब केल्याचे माहे जून २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेसाठी आवश्यक असणा-या जमिनी संपादीत करण्यासाठी शासनाकडून आदेश किंवा निधी अशी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेमुळे कायमस्वरूपी दुष्काळी असणा-या शिंदखेडा आणि धुळे तालुक्यातील जवळपास १ लाख एकर क्षेत्राला सिंचनाचा व गावांना पिण्याच्या पाण्याचा लाभ होणार असल्याने यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२७-०७-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

जलसंपदा विभागाने सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजना ता.शिंदखेडा जि.धुळे, या प्रकल्पाच्या रु. २४०७.६७ कोटी इतक्या किंमतीची प्रथम सुधारित प्रशासकिय मान्यता जलसंपदा विभाग, शासन निर्णय दि.०२/११/२०१७ अन्वये प्रदान केली आहे.

सदर योजनेच्या कामासाठी राज्य शासनामार्फत ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी मालिका XXV अंतर्गत ७५% रक्कम रु.१५५०.९५ कोटी व केंद्र शासनाच्या विशेष पॅकेज मध्ये बळीराजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून २५% रक्कम रु.५१८.१२ कोटी अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले असून, प्रतिपूर्ती स्वरुपात टप्प्या-टप्प्याने प्राप्त होत आहे.

सुलवाडे जामफळ कनोली उपसा जलसिंचन योजनेच्या कामास दि.१६/०२/२०१९ रोजी सुरूवात झाली असुन, निधी उपलब्धतेनुसार सदर योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) सदर योजनेसाठी आवश्यक २३७ हे. वनजमिनीच्या प्रस्तावास केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाच्या दि.२३/०७/०२ च्या पत्रान्वये अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे. सरकारी व खाजगी भूसंपादनाची कार्यवाही आवश्यकतेनुसार व निधी उपलब्धतेनुसार प्रगथीपथावर आहे. त्यामुळे भूसंपादन प्रक्रियेस विलंब झालेला नाही.

(३) हे खरे नाही.

उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून आवश्यकतेनुसार भूसंपादनासाठी निधी वापरण्यात येत आहे.

(४) सुलवाडे जामफळ योजनेंतर्गत विविध घटकांची कामे निधी उपलब्धतेनुसार प्रगथीपथावर आहेत
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सारथी या संस्थेत झालेला गैरव्यवहार**

**(२२) ११९९८ (१३-०७-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण विभाग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कुणबी-मराठा समाजातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व शिष्यवृत्ती देण्यासाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानवसंस्था (सारथी) ही बार्टी या संस्थेच्या धर्तीवर स्थापन करण्यात आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेत आढळून आलेली अनियमितता व गैरव्यवहार याबाबत शासनाकडे करण्यात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने नेमण्यात आलेल्या चौकशी समितीच्या प्राथमिक अहवालात वित्तीय व प्रशासकीय अनियमितता झाल्याचे आढळून आले, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१८-०८-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) प्राथमिक चौकशी अहवालाच्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्यासाठी अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीचे कामकाज सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शून्य ते पाच वयोगटातील अडीच हजाराहून अधिक**
**नवजात बालकांना पक्षाघात झाल्याबाबत**

**(२३) १२००३ (१०-०७-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील दोन वर्षात शून्य ते पाच वयोगटातील अडीच हजाराहून अधिक नवजात बालकांना पक्षाघात झाल्याचे निदान झाले असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार नवजात बालकांना पक्षघात होऊ नये यासाठी शासनाने कोणती

उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (१७-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

ACUTE FLACCID PARALYSIS च्या अहवालानुसार सन २०१८ मध्ये १८८६, सन २०१९ मध्ये २३१० व जानेवारी, २०२० ते मे, २०२० मध्ये ३१८ अशा संशयित (suspected) केसेस आढळून आल्या आहेत. सदर केसेसच्या तपासणी अहवालानुसार Wild Polio Virus आढळून आला नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) बालकांना पोलिओ होऊ नये यासाठी राज्यामध्ये नियमित लसीकरण कार्यक्रमांतर्गत बालकांना जन्मानंतर १५ दिवसाच्या आत पोलिओची लस दिली जाते. तसेच लसीकरण वेळापत्रकानुसार बालकांना दीड महिन्यापासून एक महिन्याच्या अंतराने पोलिओचे तीन ओरल डोस दिले जातात. त्याचप्रमाणे बाळ दीड वर्षाचे झाल्यानंतर पोलिओचा बुस्टर डोस देण्यात येतो. राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम व उप राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमा व AFP Survelliance हे कार्यक्रम राबविले जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयात अद्यायावत वैद्यकीय यंत्रणा उभारणेबाबत

**(२४) १२०७३ (०९-०७-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयात गंभीर आजाराच्या रुग्णांना कोरोना विषाणूच्या संसर्गाच्या काळात व्हेंटिलेटर अपुरे असून आंतररुग्ण व बाहयरुग्णांना गोळया-औषधे वेळेवर उपलब्ध होत नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयात शासनाकडून साहित्य सामुग्री तसेच कोटयावधी रुपयांची औषधे खरेदी केली जातात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आर्थोपेडीक तसेच इतर उपचाराकरिता आलेल्या रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असणारे साहित्य वेळेवर उपलब्ध होत नसल्याने रोज मोजक्याच शस्त्रक्रिया केल्या जातात त्यामुळे शस्त्रक्रियेकरिता रुग्ण दाखल झाल्यापासून २० ते २५ दिवसांनंतर शस्त्रक्रिया केली जात असल्याने या कालावधीत रुग्ण दगावण्याची शक्यता निर्माण होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ससून रुग्णालयात रुग्णांवर वेळेवर उपचार होणेकरिता अद्यायावत वैद्यकीय यंत्रणा उभारणेकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (३१-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही
(२) हे खरे आहे
(३) हे खरे नाही
(४) प्रश्न उद्‌भवत नाही
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**म्हैसाळ उपसा सिंचन प्रकल्प योजनेपासून जत (जि.सांगली)**
**तालुक्यातील ६४ गावे सिंचना अभावी वंचित असल्याबाबत**

**(२५) १२०७८ (१०-०७-२०२०). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हैसाळ उपसा सिंचन प्रकल्प योजनेपासून जत (जि.सांगली) तालुक्यातील ६४ गावे सिंचना अभावी वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर म्हैसाळ योजनेच काम संत गतीने सुरू असून जत तालुक्यातील काही भागात चर खोदून तयार आहेत परंतु वर्षभर चरीमध्ये पाईप पुरले न गेल्याने या पावसाळयातील पाणी देखील वाया जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (१०-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.
जत तालुक्याच्या पूर्व भागातील ६४ गावांपैकी १७ गावांना म्हैसाळ उपसा सिंचन योजनेचा लाभ होतो. उर्वरित ४७ गावे योजनेच्या लाभक्षेत्राबाहेर आहेत.
(२) नाही.
बंदिस्त नलिकेद्वारे वितरण व्यवस्थेची एकूण ३५५ कि.मी. पैकी २३० कि.मी. लांबीतील कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे डिसेंबर, २०२० अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सामाजिक अर्थसहाय्य योजनेच्या कामात शासकीय अधिकाऱ्यांकडून**
**विशेष मोहिम राबविणेबाबत**

**(२६) १२१०८ (१४-०७-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **विशेष**

**सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ग्रामीण भागातील गोरगरीब, दुर्बल व निराधार व्यक्तींना आधार देण्यासाठी शासनाने विविध सामाजिक अर्थसहाय्य योजना हाती घेतल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटकांना दरमहा अर्थसहाय देणेसाठी संजय गांधी निराधर अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा निवृत्त वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेजन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना राबविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे जिल्ह्यात दिनांक १५ जानेवारी, २०२० ते १५ फेब्रुवारी, २०२० या एक महिन्याच्या कालावधीमध्ये पात्र लाभार्थी शोध मोहिम राबविण्यात आली होती, उक्त मोहिमेत पुणे तालुक्यात एक किंवा शुन्य लाभार्थी असल्याचे अधिकाऱ्यांनी कळविले असल्याने, प्रत्येक गावांमध्ये तलाठी यांच्या मदतीने विशेष ग्रामसभा, शिबीरे घेवून अर्ज भरुन घेणे, कागदपत्रे गोळा करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अधिकाऱ्यांकडून उक्त कामे करण्यासह विशेष मोहिम राबविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०७-०८-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) दिनांक १५ जानेवारी, २०२० ते १५ फेब्रुवारी, २०२० या कालावधीत लाभार्थी शोध मोहिमेअंतर्गत ग्रामसभा, शिबीरे घेऊन पुणे शहर तालुका अंतर्गत १४६ प्रकरणे मंजूर केली असून पुणे जिल्हयामध्ये एकूण २७२९ प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील डिंबा उजवा कालव्याचे अपूर्ण कामासाठी व अस्तरीकरणासाठी निधी मिळण्याबाबत

**(२७) १२१११ (१६-०७-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील डिंबा उजवा कालव्याचे पाणी आंबेगाव व शिरुर तालुक्यातील ७५ गावांसाठी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डिंबा उजव्या कालव्याच्या अपूर्ण कामामुळे व अस्तरीकरणाअभावी शिरुर तालुक्यातील शिरुर ग्रामीण गावांना हे पाणी पोहचण्यास अडचण निर्माण होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डिंबा उजव्या कालव्याची शासनाने पाहणी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार शिरुर तालुक्यातील लाभक्षेत्रातील गावांना कालव्याचे पाणी पोहचण्यासाठी कालव्याची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासह कालव्याच्या अस्तरीकरणासाठी निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (१०-०८-२०२०) :** (१) अंशतः खरे आहे

डिंभे उजवा कालव्याची एकूण लांबी ११६ कि. मी. असून आंबेगांव तालुक्यातील २३ गांवे व शिरुर तालुक्यातील ११ गांवे अशी एकूण ३४ गांवे लाभक्षेत्रात येत आहेत.

(२) होय.

डिंभे उजवा कालव्याच्या उर्वरीत अस्तरिकरणाअभावी कालवा पूर्ण वहनक्षमतेने वाहत नाही, व कि. मी. १०५ ते १०९ मधील काही भागातील कालव्याचे अपूर्ण काम तसेच डिंभे उजव्या कालव्याचे वितरीका व लघु वितरीकांची कामे अपूर्ण असल्याने सदर गांवांना हे पाणी पोहचण्यास अडचण निर्माण होते.

(३) होय.

डिंभे उजव्या कालव्याची क्षेत्रीय स्तरावरुन पाहणी करण्यात आली आहे.

(४) क्षेत्रियस्तरावर केलेल्या पाहणीनुसार डिंभे उजवा कालव्याची सद्य:स्थितीत तीन कामे प्रगतीपथावर असून आणखी तीन कामांची निविदा कार्यवाही तसेच २७ जुन्या निविदांची अंदाजपत्रके अद्ययावत करणेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

सन २०२०-२१ मध्ये कुकडी प्रकल्पास रू. १०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आली आहे. उपलब्ध होणाऱ्या निधीतून अपूर्ण कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दापोली (जि.रत्नागिरी) मतदार क्षेत्रातील १४ पाटबंधाऱ्यांची प्रलंबित कामे पूर्ण करणेबाबत

**(२८) १२१३० (१०-०८-२०२०). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) मतदार क्षेत्रातील १४ पाटबंधाऱ्यांच्या कामांना निधी उपलब्ध असतानाही प्रशासकीय मान्यता न मिळाल्याने मागील २५ वर्षापासुन पाटबंधाऱ्यांची कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पाटबंधाऱ्यांच्या कामांची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदर पाटबंधाऱ्यांची प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०३-०९-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दापोली मतदार संघामध्ये १ मध्यम व १३ लघु पाटबंधारे प्रकल्प असे एकुण १४ प्रकल्प आहेत. सद्यस्थितीत कोंडीवली, पणदेरी, पंचनदी व नातूवाडी हे ४ प्रकल्प पूर्ण असून त्यांचा पाणीसाठा व सिंचन क्षमता निर्मिती पूर्ण झाली आहे व रत्नागिरी पाटबंधारे विभागामार्फत त्यांचे सिंचन व्यवस्थापन चालू आहे. उर्वरीत ४ प्रकल्प बांधकामाधीन असुन ६ अवशिष्ट

प्रकल्प आहेत.

बांधकामाधीन ४ प्रकल्पांपैकी न्युमांडवे प्रकल्प वगळता इतर पोयनार, शेलारवाडी, व तळवट या ३ प्रकल्पांची धरण व सांडवा कामे सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी स्थगित आहेत. न्यूमांडवे प्रकल्पाचे सविस्तर संकल्पने माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये प्राप्त झाल्याने उपलब्ध अनुदानामध्ये कामे प्रगतीपथावर आहेत.

पिंपळवाडी, तिडे, भोळवली, शिरसाडी, आवाशी व टांगर या ६ अवशिष्ट प्रकल्पांची धरण कामे १००% पूर्ण झाली आहेत व कालवा कामे ९०% पूर्ण झाली आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) बांधकामाधीन प्रकल्प सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्प पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच पुर्ण व अवशिष्ट प्रकल्पांची देखभाल /दुरूस्ती व पुनर्स्थापना इत्यादी कामे बिगर सिंचन लेखाशिर्षाखाली करून घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दापोली (जि.रत्नागिरी) मतदार श्रेत्रातील महिला बचत गटाच्या माध्यमातून तयार होण्या-या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याबाबत

**(२९) १२१६२ (१०-०८-२०२०). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) मतदार क्षेत्रात मोठया प्रमाणात महिला बचत गट कार्यरत असून त्यांच्या माध्यमातून अगरबत्ती, पापड, लोणचे, विविध मसाले, कोकम व इतर अनेक उत्पादने तयार केली जातात,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिला बचत गटांमध्ये तयार करण्यात येणाऱ्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध नसल्यामुळे महिला बचत गटांत कार्यरत असलेल्यां कर्मचा-यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महिला बचत गटांच्या माध्यमातून तयार होणा-या उत्पादनांना मुंबई, ठाणे, पुणे व इतर शहरामध्ये बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२७-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.

दापोली कार्यक्षेत्रात महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) स्थापित खेड सीएमआरसी मार्फत ३०७ बचत गटांची स्थापना करण्यात आली असून, त्यात ३,३७७ महिलांचा सहभाग आहे. त्यातील ८०७ महिला विविध प्रकारच्या उद्योग व्यवसायात सहभागी आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) महिलांच्या उद्योग व्यवसायाला चालना मिळावी म्हणून खेड सीएमआरसी रत्नागिरी यांनी

पूरक उपक्रम राबविलेले आहेत. बाजारपेठ सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिलेला आहे. स्थानिक स्तरावर वस्तूंची विक्री करण्यासोबत विविध प्रकारची प्रदर्शने (सरस/भीमथडी इत्यादी) यामध्ये संधी उपलब्ध करून देण्यात येते. माविमच्या पुढाकाराने amazon पोर्टल वर १५० बचत गट उत्पादनांची जोडणी केलेली आहे. इ-कॉमर्स platform च्या मदतीने घर बसल्या order मिळण्याची सुविधा उपलब्ध होत आहे. बिग बझार सारख्या व्यापक मार्केटिंग चेन सोबत बचत गटाची उत्पादने जोडण्यात माविमला यश आले आहे. अर्थात याकरिता उत्पादनाचे packaging, लेबलिंग, Licenses, यावर माविमने जाणीवपूर्वक भर दिलेला असून तेजस्विनी ब्रान्ड विकसित केलेला आहे.

थोडक्यात स्थानिक स्तरापासून राज्यस्तरापर्यंत गुणवत्तापूर्वक बचत गट उत्पादनासाठी मार्केटिंगच्या विविध संधी माविम गटांना उपलब्ध करुन देत आहे. मात्र प्रत्येक उत्पादनाच्या विक्रीला उत्पादनाची गुणवत्ता, मागणी इत्यादीनुसार प्रतिसाद अपेक्षित असतो. त्यामुळे सर्वच उत्पादनांना अपेक्षित प्रतिसाद मिळेल असे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्हयातील कार नदी प्रकल्पातंर्गत झालेल्या कालव्याची दुरुस्ती करणेबाबत**

**(३०) १२२७६ (१०-०७-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी विधानसभा मतदार क्षेत्रातील कार नदी प्रकल्पातंर्गत कारंजा व आष्टी (जि.वर्धा) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळण्याच्या उद्देशाने ३३ कि.मी. लांबीचे मुख्य कालवे झाले असून त्या कालव्याद्वारे ५६०० हेक्टर क्षेत्र सिंचन अपेक्षीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कालव्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने तेथील कालव्याद्वारे पाणी फक्त १५ कि.मी. पर्यत पोहचत असून १५०० हेक्टर सिंचन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कालव्यांच्या दुरूस्तीसाठी शासनाची मान्यता मिळाली असतानाही अद्यापपर्यत त्या कालव्याच्या दुरूस्ती कामास सुरूवात झालेली नसल्याने कारंजा व आष्टी तालुक्यातील १७ गावे सिंचनापासून वंचीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू कालव्यांची तात्काळ दुरूस्ती करुन शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत पाणी पोहचण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२७-०७-२०२०) :** (१) होय.

(२) कार प्रकल्पाच्या मुख्य कालव्याद्वारे १७ कि.मी. पर्यंत पाणी पोहचत असुन त्यापुढे टोंगलापूर लघु कालव्याद्वारे सिंचनाकरिता पाणी देण्यात येत आहे. सदर प्रकल्पातुन १७०० हे. सिंचन होत असते. अतीभरावातून तसेच अतिखोदाईतून गेलेल्या कालव्याचे भागात होणा-या गळतीमुळे कि.मी. १७ च्या पुढे सिंचन करण्यास अडचण निर्माण झाली आहे.

(३) होय, अंशत: खरे आहे.

कालव्यांचे अस्तरीकरण करण्याची चतुर्थ सुप्रमा मध्ये मान्यता प्राप्त झाली असुन अस्तरीकरणाचे संकल्पन करुन अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही सुरु असुन, अस्तरीकरणाची कामे पूर्ण केल्यानंतर १७ गावांना सिंचनाकरिता पाणी देणे शक्य होईल.

(४) डाव्या कालव्यावरील सा.क्र. ३४५ मी.वरुन उगमित होणाऱ्या लोहारी सावंगा वितरीकेच्या सा.क्र. ६५०० मी. ते ८००० मी. येथील जलसेतुचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच आवश्यक त्या ठिकाणी अस्तरीकरण करणेसाठी अंदाजपत्रके तयार करुन त्यानुसार अस्तरीकरण करुन सिंचन क्षमता वाढविण्याचे प्रस्तावित आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेच्या कामांसाठी देण्यात आलेला निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(३१) १२२९७ (१६-०७-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेच्या कामांसाठी देण्यात आलेले २५६ कोटी रुपये माहे मार्च, २०२० अखेर खर्च करण्यात न आल्याने अखर्चित राहिलेला सदरहू निधी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेच्या मुख्यालयाकडे पाठविण्याचे आदेश कृषी आयुक्तांनी दिल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ३४ जिल्ह्यातील कृषी कार्यालयांनी युनियन बँक ऑफ इंडियाच्या शाखांमध्ये या रकमा ठेवल्या असून जलयुक्त शिवार अभियान व वसुंधरा अभियान या दोन कामांचा ताळमेळ कृषी विभागाला घालता न आल्याने केंद्राचा निधी खर्च झाला नाही तथापि नियोजन करुन वेळ दिला असता तर सदर निधीचा वापर करता आला असता अशी माहिती क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार केंद्र शासनाकडून मुदतवाढ घेऊन कामे करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (२४-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (पाणलोट विकास) या केंद्र पुरस्कृत योजनेतंर्गत कार्यान्वित बॅच ४ ची मुदत मार्च २०२० रोजी संपल्याने प्रलंबित कामे पुर्ण करण्यासाठी मुदतवाढीसाठी केंद्र शासनाकडे सादर प्रस्तावानुसार माहे मार्च २०२१ अखेर पर्यंत मुदतवाढ मिळाली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा सेलगांव लवणे (ता.कारंजा, जि.वर्धा) येथील कार नदी प्रकल्पावरून उपसा सिंचन योजना कार्यान्वित होण्याबाबत**

**(३२) १२३२७ (१६-०७-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी विधानसभा मतदार श्रेत्रातील मौजा सेलगांव लवणे (ता.कारंजा, जि.वर्धा) येथील कार नदी प्रकल्पावरून उपसा सिंचन योजना कार्यान्वित होण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजा सेलगांव लवणे येथील कार नदी प्रकल्पावरून उपसा सिंचन योजना कार्यन्वित होण्याबाबत (विकाक क्र. ३०५८७८५) कार्यकारी अभियंता विदर्भ पाटबंधारे विकास मंडळ, नागपूर यांनी दिनांक १ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास सुधारित प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजा सेलगांव लवणे उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (१०-०८-२०२०) :** (१) होय. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी दि.१७/ ११/२०१४ रोजीच्या व २३/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये आर्वी विधानसभा मतदार संघातील मौजा सेलगांव लेवणे, येथील कार नदी प्रकल्पावरून उपसा सिंचन योजना प्रकल्पास मंजुरी देणेबाबत प्रस्ताव सादर केला होता. त्यासोबत सहपत्रे जोडली नसल्याने शासनाने दि. १७/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक कागदपत्रांसह नव्याने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या.त्यानंतर कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी दि.१३/ ०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदर उपसा सिंचन योजना प्रकल्पास मंजुरी देणे शक्य नाही असे सादर केले .

(२) नाही. तथापि कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी दि.०१/ ०८/२०१८ रोजीच्या पत्रामध्ये सुधारित प्रस्ताव सादर करत असल्याचे नमूद केले होते. परंतु पत्रासोबतच्या प्रस्तावात सुधारित न करता पूर्वीप्रमाणेच सदर प्रकल्पास मंजुरी देणे शक्य नाही असे नमूद केले आहे.प्रस्तुत विषयाबाबतच्या वि.का.क. ३०५८७८५ संदर्भास अनुसरून तत्कालीन जलसंपदा मंत्रीमहोदयांनी दि. ११/०४/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सदर उपसा सिंचन योजना प्रकल्पास मंजुरी देणे शक्य नाही असे मा. आमदार महोदयांना अवगत केले आहे. तद्नंतर कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचेकडून कोणताही सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**वाशिम जिल्ह्यातील जल प्रकल्पासाठी भूसंपादनाची प्रक्रिया करणेबाबत**

**(३३) १२३५५ (१०-०७-२०२०). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील तीन जल प्रकल्पांची कामे पूर्ण होण्यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने करावी व सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी अशी सूचना अप्पर मुख्य सचिव, जलसंपदा यांनी दिनांक २३ जून २०२० रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी वाशिम यांच्यासह विभागातील अधिकाऱ्यांना दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सूचनेनुसार जिल्हा प्रशासन व विभागातील अधिकाऱ्यांनी भूसंपादन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, सदर भूसंपादन किती दिवसात होणार व जल प्रकल्पाचे काम किती दिवसात पूर्ण करण्याचे नियोजन आहे व त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२७-०७-२०२०) :** (१) होय, खरे आहे.

(२) वारा (जहाँ.), वाडी रायताळ, पांग्राबंदी ल.पा. योजनेच्या कालव्याच्या तसेच अरक-चिंचाळा ल.पा. योजनेच्या बुडीत क्षेत्राच्या जमिनीसाठी संयुक्त मोजणी व मुल्यांकनाची तसेच भुसंपादनाची प्रक्रीया प्रगतीपथावर आहे.

(३) आवश्यक भूसंपादन मार्च २०२१ अखेर पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असून, जुन २०२२ अखेर पर्यंत प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) कार्यवाही प्रगतीपथावर असल्याने विलंब झालेला नाही.

---

**मौजे चिकुर्डे (ता.वाळवा, जि.सांगली) येथील वारणा नदीवरील पुला लगतच्या खचलेल्या पिचिंगचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(३४) १२५०१ (१०-०७-२०२०). श्री.मानसिंग नाईक (शिराळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिकुर्डे (ता.वाळवा, जि.सांगली) येथील वारणा नदीवरील पुला लगतच्या खचलेल्या पिचिंगचे काम प्रलंबित असल्याबाबत माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिचिंगचे काम पूर्ण न केल्यामुळे पुलास धोका निर्माण झाला असून पुलाचा भराव देखील पुरात वाहून जाऊन आजूबाजूच्या शेतीचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार पिचिंगचे प्रलंबित काम पूर्ण करण्यासह शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२७-०७-२०२०) :** (१) होय.

मौजे चिकुर्डे (कोडोली को.प.बंधारा) (ता.वाळवा, जि.सांगली) येथील वारणा नदीवरील पुला लगतच्या पोहोच रस्त्याचा भराव ऑगस्ट, २०१९ च्या अतिवृष्टीने वाहून गेला होता. त्याच्या दुरूस्तीचे काम जून, २०२० मध्ये पूर्ण झाले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

पोहोच रस्त्याचा भराव पुराच्या पाण्यामध्ये वाहून गेला होता, तथापि त्यामुळे पुलास धोका निर्माण झाला नव्हता.

(३) होय.

(४) अतिवृष्टीमुळे वाहून गेलेल्या भागाची व तेथील शेतकऱ्यांचे नुकसान झालेल्या भागाची (भराव व पिचिंग) दुरूस्तीच्या स्वरुपामध्ये जून २०२० मध्ये भरपाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खडकपूर्णा प्रकल्पातील पाणी काटोडा, रानअंत्री, चंदनपूर, कवठळ, गांगलगाव (ता.चिखली, जि.बुलढाणा) या गावांसाठी आरक्षित करणेबाबत

**(३५) १२५९२ (१०-०७-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकपूर्णा प्रकल्पातील पाणी काटोडा, रानअंत्री, चंदनपूर, कवठळ, गांगलगाव (ता.चिखली, जि बुलढाणा) या गावांसाठी आरक्षित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता पाटबंधारे खडकपूर्णा प्रकल्प यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार काटोडा, रानअंत्री, चंदनपूर, कवठळ, गांगलगाव या गावांसाठी पाणी आरक्षित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०३-०८-२०२०) :** (१) होय, याबाबत स्थानीक लोकप्रतिनिधींचे निवेदन अधीक्षक अभियंता, बुलढाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, बुलढाणा या कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

(२) याबाबत अदयाप रीतसर प्रस्ताव ग्रामपंचायतीकडून प्राप्त झालेला नाही. काटोडा, रानअंत्री, चंदनपूर, कवठळ, गांगलगाव या गावांकरिता पाणी आरक्षित/उपलब्ध करून दिल्यास खडकपुर्णा प्रकल्पाचे अंदाजित ६०० हे.सिंचन क्षेत्रात कपात करावी लागणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील मासरूळ पद्मावती धरणाची दुरुस्ती करणेबाबत

**(३६) १२५९४ (१६-०७-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील मासरूळ पद्मावती धरणाच्या विमोचकाच्या विहिरीतून सतत गळती होत असल्याने धरणाची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ जानेवारी,२०२० रोजी व दिनांक १२ मे, २०२० रोजी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मासरूळ पद्मावती धरणाची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार धरणाची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०३-०८-२०२०) :** (१) होय. ही बाब खरी आहे.

सदर दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.२३/०१/२०२० रोजी बुलडाणा येथे झालेल्या बैठकीत समक्ष सुचना दिल्या. तसेच दि.१२/०५/२०२० रोजी अधीक्षक अभियंता, बुलडाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, बुलडाणा यांना लेखी निवेदन दिले आहे.

(२) दिनांक ०६/०५/२०२० रोजी अधीक्षक अभियंता, बुलडाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, बुलडाणा यांनी सदर प्रकल्पाचे पाहणी केली आहे.

(३) धरणाच्या मुख्य विमोचकाच्या गळती दुरुस्तीच्या कामामध्ये अंतर्भुत द्वार प्रणालीच्या दुरुस्तीचे यांत्रिकी काम पूर्ण करण्यात आले असून त्यातील स्थापत्य विषयक दुरुस्ती कामाच्या निविदेचा कार्यारंभ आदेश दि.१४/०७/२०२० रोजी देण्यात आलेला असून दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेच्या धोकादायक झालेल्या इमारती व वर्ग खोल्यांच्या दुरुस्तीसाठी निधी मंजुर करणेबाबत

**(३७) १२६८७ (०९-०७-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळेच्या इमारतींचे संरचनात्मक परीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) जिल्हा परिषद स्तरावरून झाल्याबाबत व त्यात अनेक शाळा खोल्या व शाळेच्या इमारती धोकादायक असून अनेक शाळेच्या इमारतींची व वर्ग खोल्यांची पुनर्बांधणी व दुरुस्ती करण्याची आवशकता असल्याचा अहवाल जिल्हा परिषदेस सादर करण्यात आल्याचे माहे जून, २०२० मध्ये औसा तहसील कार्यालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औसा व निलंगा तालुक्यातील किती शाळांचे वर्ग व इमारती धोकादायक झालेल्या आहेत व सदर शाळेच्या वर्ग खोल्यांची व इमारतींची दुरुस्तीसाठी किती निधीची आवश्यकता आहे,
(३) असल्यास, सदर शाळेच्या वर्ग खोल्यांची व इमारतींची तात्काळ दुरुस्ती करण्यासाठी निधी मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. हसन मुश्रीफ (२८-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) औसा व निलंगा या दोन तालुक्यातील ८७ शाळांतील २३० वर्ग वर्गखोल्या धोकादायक झालेल्या आहेत.

तसेच, शिक्षक संख्येनुसार ४२ शाळेतील १२१ वर्गखोल्यांची पुनर्बांधणी करण्यासाठी रु.१०८९.०० लक्ष निधीची आवश्यकता आहे.

दोन्ही तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांच्या १०७५ वर्गखोल्या दुरुस्तीसाठी रु.३४७७.७३ लक्ष निधीची आवश्यकता आहे.
(३) जिल्हा परिषद शाळा दुरुस्तीसाठी सन २०१९-२० मध्ये जिल्हा नियोजन विकास समितील (DPDC) योजनांतर्गत १२५ शाळांच्या दुरुस्तीसाठी १२५ शाळांच्या दुरुस्तीसाठी रु.५२६.०६ लक्ष आणि ६८ वर्गखोल्या पुनर्बांधणीसाठी रु.४०५.५० लक्ष असा एकूण रु.९६१.५८ लक्ष निधी मंजूर केला आहे.

समग्र शिक्षा योजनेतर्गंत ५ नवीन वर्गखोल्यांसाठी रु.४४.८० लक्ष व ११ शाळांच्या दुरुस्तीसाठी रु.१७९.२४ लक्ष असा एकूण २२४.०४ लक्ष निधी मंजूर केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली जिल्हयात म्हैसाळ योजनेच्या कामासाठी जमिन अधिग्रहीत केलेल्या शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याबाबत

**(३८) १२६९२ (१६-०७-२०२०). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयात काम सुरु असलेल्या म्हैसाळ योजनेच्या कालवा व वितरण व्यवस्थेचे काम देखील सुरू असून सदरहू कामासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहण करण्यात आल्या परंतु त्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,काही शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहीत करून ४/५ वर्षे झाली असुन जमिनीतून कालव्याची कामे पूर्ण झाली असतानाही अद्याप काही शेतकरी मोबदल्यापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शेतकऱ्यांना तात्काळ मोबदला देण्यासह मोबदला देण्यास विलंब लावणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (१०-०८-२०२०) :** (१) नाही.
शासनाच्या प्रचलित नियमानुसार जमिन अधिग्रहीत केलेल्या शेतक-यांना मोबदला अदा करण्यात येत आहे.
(२) अंशत: खरे आहे.

म्हैसाळ योजनेंतर्गत भूधारकांची संमती पत्रे घेऊन प्रगतीपथावरील कालवा कामांसाठी एकूण ९११.१० हे. क्षेत्रापैकी थेट खरेदीने ३५६.३५ हे. व भू-संपादन कायद्यानुसार ५५४.७५ हे. क्षेत्राचा मोबदला देणेची कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्हयात सेलू पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीची झालेली दुरवस्था**

**(३९) १२७४१ (१०-०७-२०२०). डॉ.पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्यात सेलू पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे छत पावसाळ्यात गळत असून मागील पावसाळ्यात सदर इमारतीचा काही भाग कोसळून इमारतीची दुरवस्था झाली असल्याने सदर इमारत बांधकामाचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचे पत्र क्र.२२२२ दिनांक ४ जून, २०१८ नुसार ग्रामविकास विभागास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धोकादायक इमारतीमध्ये सेलू पंचायत समितीचे अधिकारी/ कर्मचारी/पदाधिकारी कामकाज करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू इमारत बांधकामाच्या प्रस्तावास तात्काळ मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२७-०७-२०२०) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) पंचायत समिती, सेलु, जि.वर्धा येथील प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्रस्तावात त्रुटी असल्याने, सदर त्रुटींची जिल्हा परिषदेकडून पूर्तता झाल्यानंतर पंचायत समिती, सेलु, जि.वर्धा येथील नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

---

**मौजे पाडळसरे (जि.जळगाव) येथील निम्न तापी प्रकल्पाचे काम पुर्ण करणेबाबत**

**(४०) १२७९० (१०-०७-२०२०). श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाडळसरे (ता.अमळनेर,जि.जळगाव) येथील निम्न तापी प्रकल्पाचे काम प्रस्तंभाच्या संकल्पनेच्या अभावी गेल्या १२ वर्षापासून प्रलंबित असल्याने प्रकल्पाचे अपूर्ण काम पुर्ण करण्यासाठी मा.जलसंपदा मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८ जानेवारी,२०२० रोजी बैठक आयोजित केलेली होती सदर बैठकीत मा.मंत्री महोदयांनी दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजीपर्यंत प्रकल्पाच्या प्रस्तंभाच्या संकल्पनेचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत निदेश दिले आहेत,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.जलसंपदा मंत्री महोदयांनी निदेश दिलेले असतानाही सदर प्रस्तंभाच्या संकल्पनेचा प्रस्ताव अद्यापर्यंत शासनाकडे सादर करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर प्रस्तंभाच्या संकल्पनेचे काम पुर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२७-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही

सदर बैठकीत निम्न तापी प्रकल्पाच्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

(२) नाही.

प्रस्तंभाचे संकल्पना बाबतचा सुधारीत प्रस्ताव तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांनी दि.१०/०७/२०२० पत्रान्वये सादर केला आहे.

(३) प्राप्त प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे .

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भीमानदी, घोडनदी व सरस्वती (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) नदीवरील नादुरुस्त बंधाऱ्यांमुळे पाण्याची साठवण क्षमता कमी झाल्याबाबत**

**(४१) १३०५१ (१०-०७-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा तालुक्यातून वाहणा-या भीमानदी, घोडनदी व सरस्वती नदीवरील नादुरुस्त बंधाऱ्यांमुळे पाण्याची साठवण क्षमता कमी झाल्याने संबंधित गावांना पाण्याचा पुरवठा करणे शक्य होत नसल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भीमानदी, घोडनदी व सरस्वती नदीवरील नादुरुस्त बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२८-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

भीमा नदीवर श्रीगोंदा तालुक्याशी संबंधीत ४ को.प.बंधारे आहेत. त्यापैकी सोनवडी व देऊळगाव राजे हे को.प.बंधारे किरकोळ स्वरूपामध्ये नादुरूस्त असून त्यांची नियमितपणे

परिरक्षण दुरूस्तीची कामे करण्यात येतात. तसेच नदीच्या वरील बाजूस असलेल्या भामा आसखेड धरणामधून नदीमध्ये पाणी सोडण्यात येत असल्यामुळे वर्षभर नदी प्रवाहित राहते. त्यामुळे बंधा-याची सरासरी क्षमता कमी होऊन पाणी पुरवठा होत नाही, अशी वस्तुस्थिती नाही.

घोड नदीवर एकूण सहा व सरस्वती नदीवर दोन बंधारे असून या बंधाऱ्यांची पाण्याची साठवण क्षमता कमी झालेली नाही.

(२) भीमा नदीवरील श्रीगोंदा तालुक्याशी संबंधीत सोनवडी व देऊळगाव राजे को.प.बंधाऱ्यांची किरकोळ दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्यापैकी देऊळगाव को.प. बंधाऱ्याचे अंदाजपत्रक तयार असून उर्वरीत सोनवडी को.प.बंधाऱ्याचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

घोड नदीवरील बंधाऱ्यांच्या दुरूस्तीसाठी सन २०१९-२० मध्ये रू.१२०.३२ लक्ष स्थापत्य विषयक कामासाठी व यांत्रिकी विभागामार्फत करण्यात येणाऱ्या कामासाठी रू.५७.०७ लक्ष असा एकूण १७७.३९ लक्ष निधी महामंडळामार्फ़त उपलब्ध करून दिला असून त्यानुसार, सदर बंधाऱ्यांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

सरस्वती नदीवरील दोनही बंधारे सुस्थितीत आहेत.

(३) कार्यवाही प्रगतीत असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुकडी प्रकल्पातून पारनेर,श्रीगोंदा,कर्जत, जामखेड व करमाळा तालुक्यातील लाभधारक शेतक-यांना पाणी मिळण्याबाबत

**(४२) १३०६५ (१०-०७-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागामार्फत कुकडी प्रकल्पातून दिनांक १३ मार्च २०२० पासून ते २७ एप्रिल २०२० या कालावधीत पारनेर,श्रीगोंदा,कर्जत,जामखेड व करमाळा या तालुक्यातील सिंचनासाठी आवर्तन सोडण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आवर्तनामधून श्रीगोंदा तालुक्यातील सिंचनासाठी पूर्ण दाबाने पाणी न मिळाल्याने अनेक शेतकरी या आवर्तनाच्या पाण्यापासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या आवर्तनातून लाभधारक शेतक-यांना पाणी न मिळाल्याने लोकप्रतिनिधी, श्रीगोंदा यांनी दिनांक १ जून २०२० रोजी वा त्यासुमारास उपोषण केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कुकडीच्या पाण्यापासून वंचित राहिलेल्या शेतक-यांना पाणी देण्यासह जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०३-०८-२०२०) :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

कुकडी प्रकल्पातून कुकडी डावा कालव्याचे सन २०१९-२० उन्हाळी हंगाम आवर्तन क्र. १ दिनांक १३ मार्च, २०२० पासून ते १० मे, २०२० या कालावधीत पारनेर, श्रीगोंदा, कर्जत व करमाळा या तालुक्यातील सिंचनासाठी सोडण्यात आले होते.

(२) हे खरे नाही.

कुकडी प्रकल्प हा आठमाही प्रकल्प असून विशेष बाब म्हणून प्रथमच सन २०१९-२० मध्ये उन्हाळी हंगामात दोन आवर्तने देण्यात आलेली आहेत. सदर आवर्तनात कालवा सल्लागार समितीत ठरलेल्या पाणी कोटयानुसार आवर्तन करण्यात आले. ज्या शेतकऱ्यांचे पाणी मागणी अर्ज (नमुना क्र.७) शाखा कार्यालयास प्राप्त झाले आहेत अशा सर्व लाभधारकांना पाणी देण्यात आले आहे. प्रत्यक्षात श्रीगोंदा तालुक्यास नियोजनापेक्षा जास्त पाणी देण्यात आलेले आहे. त्यामुळे शेतकरी या आवर्तनाच्या पाण्यापासून वंचित राहिले नाहीत.

(३) होय हे अंशत: खरे आहे.

लोकप्रतिनिधी श्रीगोंदा तालुका यांनी दिनांक ०१ जून २०२० रोजी उपोषण केले होते. तथापि, श्रीगोंदा तालुक्यातील लाभधारक शेतकऱ्यांना कुकडी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार व लाभधारकांच्या मागणीनुसार पाणी देण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### भामरागड (जि.गडचिरोली) येथील प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत बोटनफुंडी-ताडगाव-मन्नेराजाराम-बामनपल्ली रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४३) १३१७४ (१०-०७-२०२०). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामरागड (जि.गडचिरोली) येथील प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत बोटनफुंडी-ताडगाव-मन्नेराजाराम-बामनपल्ली रस्ता, १७ कोटी ५ लक्ष रुपये किमतीच्या ३८ किमी लांबीचे बांधकाम सुरु असून कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे उक्त रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे जुन, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार उक्त रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०८-२०२०) :** (१) व (२) सदर रस्त्याच्या बांधकामाबाबत जून महिन्यात तक्रारी प्राप्त झाल्या असून, कार्यकारी अभियंता (प्रमंग्रासयो), महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, जि.गडचिरोली व जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी नियुक्त केलेले उप विभागीय दंडाधिकारी श्री.मनुज जिंदल यांनी या कामाची प्राथमिक पाहणी केलेली आहे. या पाहणीत सदर रस्त्याचे डांबरीकरण उखडून गेल्याचे आढळले.

(३) संबंधित कंत्राटदाराचे देयक अदा करण्यात आलेले नाही. या प्रकरणात कंत्राटदाराची चौकशी करुन नियमानुसार कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा जिल्हयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करणेबाबत

**(४४) १३२२४ (१०-०८-२०२०). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हयात गेल्या अनेक वर्षापासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी कडून शासनाकडे वारंवार मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन शासनाकडून वेळोवेळी जिल्हयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबत आश्वासन देण्याखेरीज आजतागायत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे दिनांक २७ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोकप्रतिनिधी तसेच स्थनिक नागरिकाकडून करण्यात आलेल्या मागणीच्या अनुषंगाने सातारा जिल्हयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२०-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) नाही, हे खरे नाही.
सातारा येथील कृष्णा खोरे पाटबंधारे विकास मंहामंडळाची २५ एकर जागा शासन निर्णय दिनांक २२.०६.२०१८ अन्वये वैद्यकीय शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. तसेच, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दिनांक १५.०७.२०१९ अन्वये जिल्हा सामान्य रुग्णालय, सातारा वैद्यकीय शिक्षण विभागाकडे शैक्षणिक प्रयोजनार्थ हस्तांतरीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुर्तीजापुर चंभई (ता.मंगरूळपीर, जि.वाशिम) रस्त्यावर प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४५) १३३६६ (१७-०७-२०२०). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुर्तीजापुर चंभई (ता.मंगरूळपीर, जि.वाशिम) रस्त्यावर प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत झालेल्या पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे व निविदा प्रमाणे झाले नसल्याची तक्रार येथील शेतकऱ्यांनी कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना यांच्याकडे दिनांक २ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने तक्रारीच्या अनुषंगाने सनियंत्रण व गुणवत्ता विभागामार्फत या कामाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२४-०८-२०२०) :** (१) रा.मा. २८९ (वाडा) ते चांभई (ता.मंगरूळपीर, जि.वाशिम) या रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर असून सदर रस्त्यावरील पुलाच्या कामाची तक्रार प्राप्त झाली आहे.
(२) व (३) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या प्रचलित धोरणानुसार सदर संपुर्ण कामाची तक्रारीपुर्वीच SQM व SSQM यांचे द्वारे तपासणी झाली असून तपासणी अहवालानुसार संपुर्ण बांधकामाचा दर्जा समाधानकारक असल्याचे निष्पन्न झाले आहे.
तथापि सदर तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता यांच्या मार्फत चौकशी सुरु असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जवखेडे खालसा (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) येथील मुळा डाव्या कालव्यावरील पुलाची पुर्नबांधणी करणेबाबत

**(४६) १३४१४ (१६-०७-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जवखेडे खालसा (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) येथील कोपरे ते हनुमान टाकळी रस्त्यावरील चाळीस वर्षापूर्वी बांधलेल्या मुळा डाव्या कालव्यावरील पुलाची दुरवस्था झाल्याने सदर पुल वाहतूकीस धोकादायक असल्याची बाब दिनांक १४ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हनुमन टाकळी, कोपरे, वाघोली या गांवासह शेगाव तालुक्याच्या ठिकाणी जाणाऱ्या मुख्य मार्गावर हा पूल असल्यामुळे या रस्त्यावर जड व हलक्या वाहतुकीचे प्रमाण जास्त असून विद्यार्थीही या पुलावरुन ये-जा करत असल्याने या पुलाची तात्काळ पुर्नबांधणी करावी अशी मागणी संबंधित गावांच्या सरपंचानी पाटबंधारे विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार सदर पुलाची तात्काळ पुर्नबांधणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०३-०८-२०२०) :** (१) होय.

(२) होय.

सरपंच व ग्रामस्थ यांनी कार्यकारी अभियंता यांचेकडे दि. १४/०३/२०२० रोजीच्या प्रत्यक्ष पाहणीसमयी तोंडी मागणी केली आहे.

(३) होय.

सदर पूलाची पाहणी करण्यांत आली असून सदरचा पूल मोडकळीस आलेला असल्यामुळे सदर पूलाचे नव्याने बांधकाम करणे आवश्यक असल्याचे क्षेत्रिय कार्यालयाने नमुद केले आहे.

(४) सदर पूलाचे बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सक्षम स्तरावरुन मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.निधी उपलब्धतेनुसार पूलाचे काम त्वरीत हाती घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खानापूर, आटपाडी व तासगाव (जि.सांगली) तालुक्यातील वंचित गावांचा टेंभू उपसा सिंचन योजनेमध्ये समावेश करणेबाबत**

**(४७) १३५९७ (१६-०७-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर, आटपाडी व तासगाव (जि.सांगली) तालुक्यातील वंचित गावांचा टेंभू उपसा सिंचन योजनेमध्ये समावेश करण्याबाबत शासनाकडे सातत्याने मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात दिनांक २४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींची मा.मुख्यमंत्री यांच्यासमावेत बैठक झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यातील वंचित गावाचा टेंभू उपसा सिंचन योजनेमध्ये समावेश करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदरहू वंचित गावांचा टेंभू उपसा सिंचन योजनेमध्ये समावेश करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०७-०८-२०२०) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर बैठकीत पहिल्या कृष्णा पाणी तंटा लवादाच्या मंजूर पाण्याच्या मर्यादेत के-१ व के-५ खोऱ्यातील पाण्याचे फेर नियोजन करून वंचित क्षेत्रास पाणी देण्याच्या शक्यतेची तपासणी करावी व त्यानंतर पुढील कार्यवाही करावी असे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत.

(४) उपरोक्त निर्देशानुसार के-१ व के-५ खो-यातील पाण्याचे फेर नियोजन करून वंचित क्षेत्रासाठी पाणी उपलब्धतेच्या प्रस्तावाची कृष्णा पाणी तंटा लवाद विशेष कक्षाकडून तपासणी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या तिसऱ्या टप्प्यासाठी प्रस्ताव पाठवण्यात विलंब होत असल्याबाबत**

**(४८) १३६५३ (१८-०७-२०२०). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या तिसऱ्या टप्प्यामध्ये महाराष्ट्रासाठी ६५५० किमी रस्त्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्यादृष्टीने माहे जानेवारी, २०२० पर्यंत प्रस्ताव सादर करण्यास केंद्र शासनाकडून राज्य शासनाला कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्य राज्यांमध्ये सुमारे १७ हजार किमी च्या कामांना आतापर्यंत मंजुरी प्रदान करण्यात आलेली असताना महाराष्ट्राकडून मात्र अद्याप साधे प्रस्तावसुद्धा सादर होऊ शकलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव वेळेत पाठविले न गेल्यामुळे ग्रामीण भागात मजुरांसाठी आजच्या कोरोनाच्या काळात महत्त्वपूर्ण असलेल्या रोजगार संधी उपलब्ध होऊ शकल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त वस्तुस्थिती नमूद करून विधानसभा, विरोधी पक्षनेता यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ७ जुलै, २०२० रोजी वा त्या सुमारास प्रस्ताव सत्वर पाठविण्याबाबत निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यानुषंगाने सदर प्रस्ताव पाठविण्यासाठी अद्याप किती कालावधी अपेक्षित आहे, तसेच याबाबतची सद्य:थिती काय आहे,

(६) नसल्यास, या संदर्भातील कामांचे प्रस्ताव पाठविण्यामध्ये विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-०८-२०२०) :** (१) व (२) होय, खरे आहे.

(३) हे खरे नाही.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतील यापूर्वीची आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील कामे राज्यातील विविध भागात सुरु आहेत.

(४) होय, हे खरे आहे.

(५) याबाबत मंत्री, ग्रामविकास विभाग व सचिव, मुमंग्रासयो यांनी दिनांक १४/७/२०२० रोजी आढावा बैठक घेऊन प्रमंग्रासयो भाग-३, प्रथम बॅच अंतर्गत २,००० कि.मी. लांबीचे प्रस्ताव माहे जुलै, २०२० अखेर व द्वितीय बॅच अंतर्गत ४,५५० कि.मी. लांबीचे प्रस्ताव माहे सप्टेंबर, २०२० अखेर केंद्र शासनास सादर करण्याबाबत उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने विभागनिहाय व जिल्हा निहाय नियोजन करण्यात येवून प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही वेगाने प्रगतीपथावर आहे.

(६) सदरहू  प्रस्ताव पाठविण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे खालीलप्रमाणे आहेत :-
i. मार्च, २०२० अखेर सुरु झालेल्या COVID-१९ च्या राज्यव्यापी लॉकडाऊनमुळे रस्त्यांची क्षेत्रिय पहाणी करुन आवश्यक माहिती जमा करणे, तसेच मा.लोकप्रतिनिधींची Core Network ला मान्यता घेणे या बाबी प्रलंबित राहून विलंब झाला आहे.
ii. MRRDA यंत्रणेकडील उपलब्ध अपुऱ्या मनुष्यबळा मार्फतच मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत मोठया प्रमाणावर रस्त्यांची विकास कामे सुरु असल्याने, प्रमंग्रासयो भाग-३ च्या प्रस्ताव तयार करण्याच्या प्रक्रियेत पुरेश्या मनुष्यबळा अभावी विलंब झाला आहे.
iii. प्रमंग्रासयो भाग-३ साठी GIS Database तयार करणे आवश्यक असल्यामुळे, सदर GIS Database हा MRSAC या बाह्ययंत्रणेमार्फत तयार करण्यात जास्त वेळ खर्ची पडून विलंब झाला आहे.

---

**प्राथमिक आरोग्य केंद्र, साहुर (ता.आष्टी, जि.वर्धा) येथे स्वयंपाक गृह, धर्मशाळा व स्वच्छतागृहाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४९) १३६६० (१६-०७-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्राथमिक आरोग्य केंद्र, साहुर (ता.आष्टी, जि.वर्धा) येथे  सन २०१४-१५ मधे स्वयंपाक गृह, धर्मशाळा व स्व्च्छता गृहाचे करण्यात आलेले बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने अद्यापपर्यत आरोग्य विभागास हस्तांतरण करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तेथील स्वयंपाक गृह, धर्मशाळा व स्वच्छता गृहाचे बांधकामात बसविण्यात आलेल्या टाईल्स निघाल्या असून तेथे एक ते दिड फुटाचे खड्डे पडलेले असून दरवाजे व खिडक्या उखडल्या गेल्या आहेत तसेच इलेक्ट्रिक फिटींग सुध्दा निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे शासनाने दिलेला ७५ लक्ष रूपये निधीचा अपव्यय झाला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार निकृष्ट दर्जाच्या बांधकामास जबाबदार असणा-या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (२८-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.
प्राथमिक आरोग्य केंद्र, साहुर (ता.आष्टी, जि.वर्धा) येथे जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत स्वयंपाकगृह, धर्मशाळा व स्वच्छतागृहाचे बांधकाम सन २०१४-१५ मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे. सदर इमारतीची बांधकामे ही प्राथमिक आरोग्य केंद्राचे विस्तारीकरण असल्यामुळे वेगळे हस्तांतरण केलेले नाही.
(२) हे खरे नाही.

सदर इमारतीचा परिसर हा काळी माती (Deep Black Cotton Soil) चा असल्यामुळे इमारत बांधकामानंतर जोत्यातील भराव काही प्रमाणात दबला गेल्यामुळे इमारतीचे फ्लोरिंग दबून टाईल्स तुटल्या आहेत तसेच इलेक्ट्रिक फिटींगचे काम करण्यात आलेले नाही. इमारतीचे दरवाजे तसेच खिडक्यांना दुरूस्ती आवश्यक असल्याने तसेच विद्युतीकरण इ.बाबींसाठी जिल्हा परिषद, आरोग्य समितीकडे प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केलेला आहे
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**निळवंडे व पिंपळगाव खांड धरण (ता.अकोले, जि.अहमदनगर) प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांबाबत**

**(५०) १३७३६ (१६-०७-२०२०). डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निळवंडे व पिंपळगाव खांड धरण (ता.अकोले, जि.अहमदनगर) प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादित केल्या असून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना अद्यापही योग्य मोबदला मिळाला नसल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांनी योग्य मोबदला मिळण्यासंबंधी वारंवार मोर्चे व आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निळवंडे व पिंपळगाव खांड धरण प्रकल्पासाठी भुसंपादित केलेल्या शेतकत्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (१०-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
निळवंडे-२ - आजपर्यंत संपादित जमिनीच्या भूसंपादन निवाड्यानुसार भूसंपादन अधिकारी यांचे मागणी प्रमाणे मोबदला रक्कम वेळोवेळी भूसंपादन अधिकारी / महसूल विभाग यांचेकडे वर्ग करण्यात आलेली आहे.
पिंपळगावखांड - पिंपळगावखांड प्रकल्पासाठी संपादित जमिनीच्या भूसंपादन निवाड्यानुसार भूसंपादन अधिकारी यांचे मागणी प्रमाणे मोबदला रक्कम वेळोवेळी भूसंपादन अधिकारी / महसूल विभाग यांचेकडे वर्ग करण्यात आलेली आहे.
(२) निळवंडे-२ - अंशतः खरे आहे.
आंदोलने होत आहेत तथापी मावेजाच्या मागणीसह इतरही मागण्या होत आहेत. अकोले तालुक्यातील लोकप्रतिनिधी व प्रकल्पग्रस्त शेतकरी यांनी निळवंडे धरणाचे कालवे बंदिस्त पाईपने करावे, चालू बाजारभावाप्रमाणे जमीनीची मोबदला रक्कम मिळावी इ. मागण्यांसाठी मोर्चे व आंदोलने केली आहेत.
पिंपळगावखांड - हे खरे नाही.

(३) प्रश्न भाग १ च्या उत्तराप्रमाणे
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.